# भारतातील सुशासन

प्राचार्य डॉ. दिनकर विष्णू पाटील, कु. सुशांत चंद्रकांत पाटील, संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**गोषवारा :**

'सुशासन' ही लोकप्रशासन राज्यातील अलीकडची कल्पना मानली जात असली तरी प्राचीन काळापासून ही एक गतिशील उच्च तत्व म्हणून प्रशासनात कार्यरत होती असे दिसते. १९८८ साली जागतिक बँकेने 'सुशासन' ही संकल्पना आधुनिक अर्थाने प्रथम मांडली. १९९२ साली जागतिक बँकेने जारी केलेल्या अहवालात या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले व तिथपासून जगभर या संकल्पनेचा अतिशीघ्र प्रवास चालू झालेला दिसतो. जागतिक बँकेने १९९२ च्या आपल्या अहवालात 'सुशासनाचे' चार पैलू अधोरेखित केले. सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्थापन, उत्तरदायित्व, विकासाची वैधानिक संरचना व माहिती आणि पारदर्शकता या चार तत्त्वांना सुशासन संकल्पनेत जागतिक बँकेने आधारभूत मानले. याच काळात 'सुशासन' हा लोकप्रशासन शास्त्राच्या अभ्यास विषयाचा ही भाग बनला, डेव्हिड ऑलबोर्न व यांचे या संदर्भातील योगदान महत्त्वाचे मानले जाते. "Reinventing Government" या ग्रंथात, ऑलबोर्न व ग्लॅबरलर यांनी 'सुशासन' या संकल्पनेची मांडणी केली आहे. जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगी करणाच्या प्रक्रियेने निर्माण झालेल्या आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रामुख्याने सुशासनाचे प्रतिमान विकसित झालेले दिसते. यादृष्टीने सुशासनाचा विकास, स्वरूप व मूलभूत तत्त्वांचा भारताच्या संदर्भात अभ्यास करणे आवश्यक ठरते. हा अभ्यास करत असतानाच भारतीय घटनाकाराना अपेक्षित असलेली 'सुशासना'ची संकल्पना आणि त्यासाठी त्यांनी भारतीय संविधानात त्यासंदर्भात केलेल्या तरतूदी याही 'सुशासनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात राज्यसंस्थेला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. राज्यसंस्थेचे प्रमुख अंग म्हणजे शासनसंस्था होय. शासनसंस्थेची संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात असून तिचे स्वरूप स्थळ, कालपरत्वे बदललेले आहे. उदा. राजेशाही, लोकशाही इ. नागरी वसाहतींची निर्मिती झाल्यापासून शासनसंस्थेची संकल्पना अस्तित्वात आहे. सामान्यतः अधिकारांचा वापर करून ठराविक जनसमूहासाठी विशेष निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे या प्रक्रियेला 'शासनसंस्था' असे म्हणतात. सुशासन ही संकल्पना तशी नवी नाही. आधुनिक काळात ती जरी वापरली जात असली तरी चांगल्या शासनसंस्थेची तत्त्वे पूर्वीपासूनच अस्तित्वात असलेली दिसतात. लॉक, रूसो, मिल, ग्रीन, लास्की या विचारवंतांच्या विचारांमध्ये सुशासनाची बीजे दडलेली दिसतात. भ्रष्टाचार विरोधी, प्रशासकीय उत्तरदायित्व असणारी, कार्यक्षम सहभाग दर्शवणारी, पारदर्शी, प्रतिक्रियात्मक, सदसदविवेकबुद्धीला अनुसरून कार्यरत असणारी समानतेला प्राधान्य देणारी शासनसंस्था म्हणजे सुशासन किंवा सद्शासन होय.

शासनसंस्थेने निर्णय घेताना समाजातील सर्व घटकांना अनुसरून निर्णय घेतले पाहिजे. चांगल्या शासनसंस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी नागरिकांना शासकीय पातळीवरील निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली पाहिजे. प्रशासकीय निर्णयांची माहिती जाणण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. अशा शासन संस्थेला 'सुशासन' म्हणता येईल. त्यासाठी आपल्याला सुशासनाचा अर्थ, त्याच्या व्याख्या जाणून घेऊन सुशासन आणि भारत याचा मागोवा घ्यावा लागेल.

**संशोधन समस्या :**

'खाउजा' धोरणामुळे निर्माण झालेल्या सुशासनाच्या प्रतिमानाचा चा अर्थ, त्याचे स्वरूप आणि मूलभूत तत्वांचा भारताच्या संदर्भात अभ्यास करणे गरजेचे आहे. या संशोधन समस्येतूनच संशोधकाला प्रस्तुत शोधनिबंधाची आवश्यकता भासली.

**उद्देश :**

आधुनिक काळात राज्यसंस्थेचे कार्य व्यापक बनले असून, त्याला लोककल्याणकारी राज्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे राज्यसंस्थेला राज्याच्या एकूण कारभारात अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत 'सुशासन' ही संकल्पना समजून घेऊन भारताच्या संदर्भातील तिचे स्थान याचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर अभ्यासातून पुढील उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

(अ) 'सुशासन' ही संकल्पना जाणून घेऊन तिचा अर्थ समजावून घेणे.

(ब) 'सुशासन' संकल्पनेचा विकास जाणून घेत असताना भारतातील संदर्भ जाणून घेणे.

(क) सुशासनाच्या मूलभूत वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

(ड) भारताच्या संदर्भात 'सुशासन' संकल्पनेचा अभ्यास करणे.

(इ) सुशासनासमोरील आव्हानांचा आढावा घेणे.

**गृहितके :**

१) 'सुशासन' ही व्यापक संकल्पना असून त्यामध्ये जनतेचे सामूहिक हित सामावलेले आहे.

२) सुशासन संकल्पनेचे संदर्भ प्राचीन भारतातील तत्वज्ञानामध्येही पाहायला मिळतात.

३) भारतातील कल्याणकारी राज्याच्या निर्मितीमध्ये सुशासनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. उदा. वर्तमानपत्रे, नियतकालिके, विविध संदर्भग्रंथ, अहवाल इ. चा आवश्यकतेनुसार वापर करण्यात आला आहे.

**Keywords :**

सहभागप्रधान, पारदर्शकता, सुशासन, प्रतिसादात्मक

**विषय विवेचन :**

२१ व्या शतकात खाजगीकरण, उदारीकरण, वैश्विकीकरण (जागतिकीकरण) यांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक कल्याणकारी राज्यातील शासनव्यवस्थेचे 'सुशासन' हे आधुनिक रूप आहे. वास्तविक पाहता १९८९ मध्ये जागतिक बँकेने आपल्या अहवालात 'शासन' हा शब्द सर्वप्रथम वापरला. पुढे १९९२ मध्ये प्रकाशित अहवालात जागतिक बँकेने ही संकल्पना अधिकाधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच 'सुशासन' ही संकल्पना उदयास आली.

**'सुशासना'चा अर्थ :**

'सुशासन' या संज्ञेचा अर्थ समजून घेण्यापूर्वी 'सामान्य हित' या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

'सामान्य' शब्दाचा आशय समुदायाद्वारे हेतू व मूल्यांना सामूहिक स्वरुपात स्वीकार करणे. अशाप्रकारे सामान्य जनांचे हित म्हणजे 'सामान्य हित' होय. अधिकतम लोकांचे अधिकतम हित अथवा सार्वजनिक हित म्हणजे सामान्य हित,

सर्वसाधारणपणे चांगले शासन म्हणजे सुशासन होय, हा शब्द 'सु' आणि 'शासन' या दोन शब्दांपासून तयार झाला आहे, सुशासन म्हणजे समस्त जनतेच्या हितासाठी कार्य करणारे शासन होय.

व्याख्या :

'सुशासन' संकल्पनेचा अर्थ पुढील काही व्याख्यांच्या आधारे अधिक स्पष्ट करता येईल.

(अ) प्लेटो : 'न्यायावर आधारित शासन म्हणजे सुशासन होय."

(ब) जागतिक बँक : "परिणामकारक लोकसेवा, विश्वासार्ह न्यायव्यवस्था व लोकांप्रती उत्तरदायी असणारे प्रशासन म्हणजे सुशासन होय."

(क) फ्रीमॅन यांच्या मते, "जेथे कमीत कमी शासन असेल ते सरकार म्हणजे सुशासन होय."

(ड) युनेस्को : उत्तरदायित्व, पारदर्शकता, समता व लोकशाही या तत्त्वांना प्राधान्य देणारे शासन म्हणजे सुशासन होय.

**सुशासन संकल्पनेचा विकास :**

'सुशासन' ही संकल्पना जागतिक बँकेने १९८९ साली प्रथम प्रकाशझोतात आणली व १९९२ च्या अहवालाने ती जगभर प्रकाशित झाली असली तरी सुशासन ही संकल्पना इतिहास काळात प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली आढळते. समकालीन सुशासन संकल्पनेचे अवलोकन करण्याकरिता सुशासन संकल्पनेचा विकास जाणून घेणे हे त्यादृष्टीने आवश्यक ठरते.

'प्लेटो' या प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्याच्या विचारांमध्ये आपणास सुशासनाची बीजे आढळतात. प्लेटोने 'द रिपब्लिक' या ग्रंथात तत्त्वज्ञ राजाची व न्याय सिद्धांताची जी मांडणी केली आहे त्यात सुशासनाची संकल्पना अधोरेखित झालेली दिसते. प्लेटोने तात्कालीन राज्यव्यवस्थेस अराजक व अव्यवस्थेतून बाहेर काढण्याकरता आदर्श राज्य व आदर्श समाज रचनेचे स्वप्न प्रस्तुत केले होते. एकंदरीत राज्याला सर्व दोषांतून मुक्त करण्याकरता तत्वज्ञ राज्यकर्त्यांच्या माध्यमातून सुशासनाची कल्पना मांडलेली दिसते.

**भारताच्या संदर्भात सुशासन संकल्पना :**

भारतीय संदर्भातही सुशासनाच्या विचार संकल्पनेचे प्राचीन संदर्भ पहावयास मिळतात. भारतातील पौराणिक व इतिहासकालीन साहित्यात प्रामुख्याने बौद्धकालीन जातक कथा, महाभारतातील शांतीपर्व, शुक्राचार्यांचे नीतिसार, पाणिनीचे

अष्टाध्याय, वाल्मिकींचे रामायण, कौटिल्याचे अर्थशास्त्र यासारख्या ग्रंथांमध्ये सुशासनाशी संबंधित विचार मोठ्या प्रमाणात आढळतात. उत्तम शासन व शासनकर्ते कोणास म्हणावे, याची चर्चा या ग्रंथांच्या माध्यमातून प्राचीन भारतातही झालेली दिसते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील संदर्भ आधुनिक अर्थाने महत्त्वपूर्ण मानला जातो. कौटिल्याच्या मते "जर राजा समृद्ध असेल तर त्याची प्रजा सुद्धा समृद्ध असेल, राजाचे जे चारित्र्य असेल तेच प्रजेचे असेल. प्रजेची उन्नति वा अवनती राजावरच आधारलेली असते. कारण राजा हा सर्व गोष्टींचे उगमस्थान आहे. सुष्टांचा सन्मान व दुष्टांना शासन करणे राजालाच शक्य असते. प्रजेचे सुख हेच राजाचे सुख, प्रजेचे हित हेच राजाचे हित. स्वतःच्या इच्छेची तृप्ती करण्यात त्याचे हित नसते." यादृष्टीने कौटिल्याच्या विचारांमध्ये सुशासनाची कल्पना व्यक्त होताना दिसते.

**सुशासनाची वैशिष्ट्ये :**

जागतिक बँकेने 'सुशासन' या संकल्पनेत तीन पैलूंवर भर दिलेला आहे.

(अ) राजकीय सत्तेचे स्वरूप

(ब) राष्ट्रातील आर्थिक, सामाजिक संसाधनाच्या विकासासाठी उचित व्यवस्थापकीय व्यवस्था.

(क) सरकारची योजना, ध्येय धोरणांची अंमलबजावणी किंवा कार्य करण्याची क्षमता.

आधुनिक काळात सुशासनाची व्याप्ती वाढलेली असून राजसत्तेची वैधानिकता सिद्ध करण्यासाठी लोकशाहीकरण, वृत्तपत्र स्वातंत्र्य, प्रशासनामध्ये कार्यक्षमता, सरकारचे उत्तरदायित्व आणि जबाबदारी, प्रशासनातील जनतेचा वाढता सहभाग, कायद्याचे राज्य, मानवी हक्कांवर विश्वास, सरकारच्या धोरणांची निर्मिती आणि जनतेची सेवा करण्याची क्षमता अशा विविध पैलूंचा समावेश सुशासनात केला जातो. सुशासनाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :

(अ) सहभाग प्रधान :

'सुशासन' हे सहभागावर आधारित शासन असतं. समाजातील महत्त्वाच्या घटकांचा उदा. स्त्री, पुरुष, तरुण वर्गाचा समावेश प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सुशासनात असतो.

(ब) कायद्याचे राज्य :

सुशासनाचे कायद्याचे राज्य हे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट आहे. शासनव्यवस्था योग्य रीतीने चालवण्यासाठी कायद्याची योग्य चौकट असणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर कायद्याची अंमलबजावणी निःपक्षपाती पणे होणे आवश्यक आहे.

(क) प्रशासनिक पारदर्शकता :

सामान्यतः शासनसंस्था कार्यक्षम व पारदर्शक असावी लागते. म्हणजेच शासकीय, प्रशासकीय निर्णयांची माहिती, त्यांची अंमलबजावणी, त्यांचे परिणाम इत्यादींची माहिती जनतेला असणे आवश्यक असते. कारण हे निर्णय लोकहिताशी संबंधित असतात.

(ड) सद्सदविवेक बुद्धीला अनुसरून निर्णय :

सुशासनात सदसदविवेकबुद्धीला प्राधान्य दिले जाते. शासनकर्त्याद्वारे प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार केला जातो. जनतेच्या प्रश्नांना अनुसरून जनहिताला प्राधान्य देऊन योग्य निर्णय घेतले जातात.

(इ) समानता :

सुशासन व्यवस्था ही कायद्याच्या राज्याच्या तत्त्वावर आधारित आहे. कायद्याच्या राज्यात कोणत्याही नागरिकांमध्ये वंश, जात, धर्म, वर्ण, रंग इ. कोणताही भेदभाव न करता सर्वांना समानतेने वागवले जाते. तसेच समाजातील सर्व घटकांना विशेषतः दुर्बल, दुर्लक्षित घटकांना आपले जीवनमान सुधारण्याची संधी मिळणे आवश्यक ठरते.

(ई) प्रतिसादात्मक :

चांगली शासनव्यवस्था ही प्रतिसादात्मक स्वरूपाची असते. सुशासनात सर्व शासकीय संस्था व व्यवस्था नागरिकांना विविध सेवा पुरविण्याचा प्रयत्न करतात.

(उ) उत्तरदायित्व आणि जबाबदारी :

उत्तरदायित्व ही सुशासनाची महत्त्वाची गर ज आहे. राज्यसंस्थेने जनतेप्रती पूर्ण जबाबदार राहून कार्य केले पाहिजे. प्रशासनाचे कार्य अधिक कार्यक्षम, पारदर्शी व यशस्वी करण्यासाठी त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक ठरते. हे नियंत्रण ठेवण्याचे कार्य कायदेमंडळाकडून पार पडले जाते.

(ऊ) कार्यक्षमता आणि परिणामकारकता :

चांगली शासनसंस्था म्हणजे संस्था आणि व्यवस्था यांनी उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करून समाजाच्या गरजांची पूर्तता करणे होय. म्हणजेच शासनसंस्थेने केलेल्या कार्याचे चांगले परिणाम समाजात प्रतिबिंबित झाले पाहिजेत. तसेच

शासनसंस्थेतील अधिकारी वर्ग स्वच्छ, कार्यक्षम आणि प्रामाणिक असला पाहिजे, तरच शासनव्यवस्थेचे कार्य चांगल्या रीतीने पार पडले जाऊ शकते.

**सुशासन व भारत :**

जागतिक स्तरावर विकसनशील देशांच्या यादीत भारत हा एक महत्त्वाचा देश आहे. १९५० च्या दशकात आशिया व खंडात साम्राज्यशाहीच्या विरोधात लढा देऊन वसाहतवादापासून ज्या राष्ट्रांनी स्वातंत्र्य मिळविण्यात यश मिळवले त्यात भारत हे एक राष्ट्र प्रमुख मानले जाते. स्वातंत्र्यानंतर आशिया व आफ्रिका खंडातील या अविकसित राष्ट्रांनी राष्ट्रउभारणी करिता लोकशाही शासनव्यवस्थेचाच प्रामुख्याने स्वीकार केला. मात्र अल्पावधीतच भारत अपवाद करता इतर राष्ट्रांमध्ये लोकशाही व्यवस्थेचे प्रतिमान कोसळले. भारत हा एकमेव देश आहे जेथे मागील ७० वर्षांहून अधिक काळ लोकशाही शासनव्यवस्थेचे प्रतिमान रुजले आहे. कल्याणकारी राज्य संकल्पनेचे प्रयोग निरंतर चालू आहेत. भारताने स्वातंत्र्याच्या वेळी उभ्या असलेल्या अवाढव्य व असंख्य समस्यांना सामोरे जाताना, त्याचे निर्मूलन करण्याकरिता प्रामुख्याने प्रशासनाची मदत घेतली. संविधानकारांमध्ये ही यादृष्टीने सुशासनाची जाणीव सुस्पष्ट स्वरूपात होती. १९९० च्या नंतर भारतात ही जाणीव अधिक अधोरेखित व वृद्धिंगत झाली. यादृष्टीने भारतातील सु-शासनाच्या वास्तवाचे अवलोकन करणे ही अत्यावश्यक ठरते.

**भारतीय राज्यघटनेतील घटनात्मक तरतूदी :**

भारतीय संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानापैकी एक संविधान मानले जाते. भारतीय संविधानकारांनी आदर्शवाद व व्यवहारवाद यात समन्वय साधण्यात यश संपादन केले आहे. आदर्शवाद व समन्वयवादाच्या या अति मनोहर समन्वयातूनच सु-शासन विषयक संविधानात्मक तरतूदी आपणास आढळतात. त्याची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल :-

१) संविधानाचा सरनामा :

भारतीय संविधानाची उद्देशिका (सरनामा) हे स्वातंत्र्योत्तर काळातील 'सु-शासनाचा' एक प्रकारे जाहीरनामाच मानावा लागेल. सु-शासनाशी निगडित सर्व प्रमुख बाबींना भारतीय संविधानाची उद्देशिका अधोरेखित करते. भारतीय नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय यांचे अभिवचन देत स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारित समाजरचना निर्माण करण्याचा संकल्पही देते. एकंदरीत भारतीय संविधानाचा सरनामा सुशासनाची संक्षिप्त स्वरूपात मांडणी करून ते प्रत्यक्षात आणण्याची जबाबदारी शासनकर्ते व नागरिक या दोहोंवर सोपवताना दिसतो.

२) मूलभूत अधिकारांची मांडणी :

भारतीय संविधानाचा तिसरा भाग हा संविधानाच्या मूलभूत संरचनेचा एक अविभाज्य भाग मानला जातो. भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागातील कलम १२ ते ३५ दरम्यान भारतीय नागरिकांना प्रदान करण्यात आलेल्या मूलभूत अधिकार विषयक तरतूदी आहेत. या अधिकारांच्या माध्यमातून भारतीय संविधान सु-शासनाच्या संकल्पनेस संविधानिक स्वरूप देते. ज्यामुळे या संविधानिक अधिकारांची अंमलबजावणी करणे, भारत सरकारवर बंधनकारक ठरते.

३) मार्गदर्शक तत्त्वांची मांडणी :

भारतीय संविधानकारांनी संविधानाच्या चौथ्या भागात स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेवर येणाऱ्या राज्यकर्त्यांकरिता मार्गदर्शक तत्त्वांची नोंद करण्यात आलेली आहे. या तरतूदींना संविधानाच्या मुख्य गाभ्या पैकी एक भाग असा दर्जा देण्यात आला असून ही मार्गदर्शक तत्त्वे एक प्रकारे सु-शासनाच्या तत्त्वांची मांडणी वाटावी एवढी सुशासनाशी सुसंवादी आहेत. यातील काही तत्त्वांचा उदाहरणासाठी संदर्भ घेतला तर जसा की सर्व लोकांसाठी कल्याणाची भूमिका, स्त्री व पुरुषांना समान कामाकरता समान वेतन, कामगारांसाठी निर्वाह योजना, सत्तेचे विकेंद्रीकरण ही तत्त्वे सु-शासनाची तत्वे होत.

**सुशासनापुढील आव्हाने :**

आधुनिक काळात सु-शासनाला जसे महत्त्व प्राप्त झाले आहे, परंतु सु-शासनापुढे अनेक आव्हाने देखील आहेत. ती खालीलप्रमाणे :-

१) राजकीय अस्थिरता :

सु-शासनातील प्रमुख आव्हान म्हणजे राजकीय अस्थिरता होय. राजकीय अस्थैर्यामुळे शासनाची ध्येय- उद्दिष्टे मागे पडतात, परिणामी देशाचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही.

२) राजकीय पक्षांतील वाढ :

राजकीय पक्षांची वाढती संख्या ही समस्या प्रामुख्याने भारतात आढळते. या राजकीय पक्षांच्या निर्मितीमागे 'सत्तेची अभिलाषा' हा घटक असून या पक्षांची विशिष्ट अशी विचारधारा नसून वेळोवेळी त्यांनी आपली निष्ठा, विचार, ध्येय धोरणे बदलली आहेत त्यामुळे सु-शासनाची कल्पना केवळ नाममात्र ठरली.

३) राजकारणाचे गुन्हेगारीकरण :

राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे सुशासनापुढील सर्वाधिक कठीण आव्हान आहे. आजमितीला राजकारण हा एक व्यवसाय बनला आहे. गुन्हेगारी जगतातील व्यक्ती राजकारणात येऊन निवडणुका लढवितात. वेळप्रसंगी निवडूनही येतात. कालांतराने आपल्या गुन्हेगारी टोळीच्या कारवायांना ते पाठिंबा देतात आणि आपले हितसंबंध सांभाळून ते वाढविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सु-शासनाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो.

४) भ्रष्टाचार :

भ्रष्टाचार ही सु-शासना समोरील महत्त्वाची समस्या आहे. दिवसेंदिवस शासन प्रशासनातील भ्रष्टाचार वाढत चालला असून त्यामुळे लालफीत शाहीला चालना मिळत आहे. अशाप्रकारे सुशासनापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या असून, त्यामुळे सुशासनाची मुख्य उद्दिष्टे बाजूला पडत आहेत.

**निष्कर्ष :**

१) सुशासनामध्ये जनतेचा कार्यक्षम सहभाग असतो. ते सहभागावर आधारित शासन असतं. समाजातील सर्व घटकांचा सहभाग सुशासनात असतो.

२) सुशासनाच्या संकल्पनेचे संदर्भ प्राचीन भारताच्या अनेक ग्रंथांच्या माध्यमातून पहावयास मिळतात. म्हणजेच भारताच्या संदर्भात 'सुशासन' संकल्पना प्राचीन कालावधीपासून अस्तित्वात असल्याचे दिसते.

३) सुशासनात सद्सदविवेकबुद्धीला प्राधान्य देऊन शासनकर्त्यांद्वारे प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार केला जातो.

४) भारतीय संविधानामध्ये घटनाकारांनी सुशासनाच्या तत्त्वांची मांडणी करून सुशासनाला घटनात्मक दर्जा देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भसूची :**

१) बंग के. आर., महाराष्ट्र प्रशासन, जून २०१३, विद्या पब्लिकेशन्स, मुंबई.

२) शासन से सुशासन की ओर, गौरव कुमार, जानेवारी २०१९, ब्लू बँक पब्लिकेशन, न्यू दिल्ली.

३) माहेश्वरी श्रीराम, भारतीय प्रशासन (अनुवाद साधना कुलकर्णी), मे २००२, ओरिएन्टल लॉगमन प्रकाशन, हैद्राबाद.

४) डॉ. वा.भा.पाटील, भारतीय प्रशासन, जून २०१९, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

५) www.google.co.in

६) www.wikipedia.org

७) www.orfonline.org/marathi